# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/04/2023 (शनिवार) सकाळ

---

## खुनाचा प्रयत्न करुन फरार झालेला आरोपी
## नागपूर (ग्रामीण) स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांचे आदेशान्वये संपुर्ण जिल्हयात पाहिजे असलेले आरोपी यांची मोहीम सुरू असतांना आपल्या मार्गदर्शनात उमरेड उपविभागात पाहिजे असलेल्या आरोपीचा शोध घेत असतांना गोपनिय बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन कुही येथील अप. क्र. ८३/२०२३ कलम ३०७, ३२४, १४३, १४४, १४६, १४७, १४८, १४९, ४२७ भादंवि. अन्वये पोलीस स्टेशन कुही येथे गुन्हा नोंद झाला होता. या गुन्हयातील **आरोपी नामे– अभिषेक उर्फ बारीक रूपचंद वांद्रे, वय २४ वर्ष, रा. त्रिषरण चौक रामेश्वरी रोड नागपूर** हा आजपावेतो फरार असुन आपले अस्तीत्व लपवून पोलीसांपासून लपून छपून रामेश्वरी येथे वास्तव्य करीत होता अशी गोपनिय माहिती प्राप्त झाल्याने सदर आरोपीचा शोध घेतला असता नमुद ठिकाणी जावुन माहितीची पडताळणी करून दिनांक ०६/०४/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार नरेंद्र पटले, अरविंद भगत, पोलीस नायक मयुर ढेकले, बालाजी साखरे, अजीज शेख यांचेसह रामेश्वरी हद्दीत सापळा रचुन फरार आरोपीला ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारून शहानिशा केली असता त्याने आपले नाव **अभिषेक उर्फ बारीक रूपचंद वांद्रे, वय २४ वर्ष, रा. त्रिषरण चौक रामेश्वरी रोड नागपूर** असे सांगितलेवरून तसेच आरोपीचा नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास ताब्यात घेवुन सदर गुन्हयाबाबत विचारपुस करून आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन कुही यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद सा., अपर पोलीस अधीक्षक सा. डॉ. संदिप पखाले सा. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे पोलीस हवालदार नरेंद्र पटले, अरविंद भगत, पोलीस नायक मयुर ढेकले, बालाजी साखरे, अजीज शेख यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत मौजा मुरमुरा भट्टी येथे दिनांक ०७/०४/२०२३ चे ०३/०० वा. ते ०५/०० वा. दरम्यान टिप्पर वाहन क्र. एम.एच.–४०/वाय.–७०७३ मधील चालक **आरोपी नामे– रितेश गुरूदास मोहबे, वय ३२ वर्ष, रा. पिपरी कन्हान** हा विनापरवाना अवैधरित्या ६ ब्रास रेतीची चोरी करून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने चालकाचा ताब्यातुन ६ ब्रास रेती किमंती अंदाजे २५,०००/–रू टिप्पर वाहन क्र. एम. एच.–४०/वाय.–७०७३ किमंती अंदाजे १३,००,०००/–रू असा एकुण वाहनासह किमंती अंदाजे १३,२५,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोलीस शिपाई सचिन दखने ब. नं. २२४५ पो.स्टे. रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक योगेश भुरे ब. नं. ६७३ पो.स्टे. रामटेक मो. नं. ७७२२०००३६७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर